(10)

3156
10/9/13

महाराष्ट्र शासन

शासकीय अध्यापक महाविदयालय

३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई ४०००० १

Phone:02222620050 Fax:02222612188

E-mail: secondarytrainingcollege@gmail.com Visit us at: www.secondarytrainingcollege.org

जा.क्र./ शाअम /सेवांतर्गत/ प्राशिनिश्रेप्र/२०१३-२०१४ / ५८५ दिनांक ३०।८।२०१३

प्रति,
मा.शिक्षण निरिक्षक (दक्षिण /उत्तर /पश्चिम) विभाग
मुंबई यांचे कार्यालय,

विषय :- प्राथमिक शिक्षक निवड श्रेणी प्रशिक्षण २०१३-२०१४ चे प्रशिक्षण वर्ग आयोजित करणेबाबत .
(इ.५वी ते ८वी च्या वर्गांना शिकवणा-या माध्यमिक शिक्षकांचे निवड श्रेणी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्याबाबत)

संदर्भ : -

१) जा.क्र.मराशैसंप्रप / राशिप्रम/ प्राशिनिश्रेप्र /२६५४/ २०१३ दि.१३.०८.२०१३ चे पत्र
२) शासन पत्र क्र.पीआरई-२००७ /(७५४/ ०७) /प्राशि.-१,दि.२८ फेब्रुवारी २००८

मा. महोदय ,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद राज्य शिक्षक प्रशिक्षण मडळ पुणे याच्या नियोजनानुसार आयोजित करण्यात आलेले निवड श्रेणी प्रशिक्षणासाठी पात्र ठरणा-या निकषपूर्ण करणा-या प्राथमिक शिक्षकांच्या नावाची यादी छाननी करून सत्रानुसार ५० शिक्षकांना प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्तीच्या आदेशामध्ये आवश्यक शूल्कासबधी माहिती देण्यात यावी व प्रशिक्षणासाठी हजर राहाण्याबाबत कळविण्यात यावे ही विनती.

सहपत्र - महाराष्ट्र राज्य शै.सं.व प्र. परिषद
राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळ पुणे-३०

माहितीस्तव - मा. शिक्षण उपसंचालक मुंबई-४

आपला विश्वासू

प्राचार्य
शासकीय अध्यापक महाविद्यालय
३, महापालिका मार्ग, धोबी तलाव,
मुंबई- ४०० ००१

10/9/13

दूरध्वनी :२४४७६९३८,२४४७५५७१,२४४५९३३०
फॅक्स : ०२०-२४४७७०९०, २४४८१२६९
ई-मेल : dir.mscert@gmail.com
mscert.sbte@gmail.com
Website : www.mscert.org.in

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११ ०३०.

जा.क्र.मराशैसंप्रप/राशिप्रमं/ प्राशिनिश्रेप्र /२६५१/२०१३ दि. १३/०८/२०१३

प्रति ,

१. प्राचार्य ,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था , (सर्व)

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) ,
जिल्हा परिषद (सर्व)

३. प्राचार्य ,
सेवांतर्गत अध्यापक विदयालये (सर्व)

विषय :- प्राथमिक शिक्षकांसाठी निवडश्रेणी प्रशिक्षण -
२०१३-१४ नियोजन

संदर्भ :- १. शासन पत्र क्र.पीआरई - २००७ / (७५४ / ०७) /
प्राशि- १ , दि . २८ फेब्रुवारी २००८

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार सन २०१३-१४ साठी प्राथमिक शिक्षकांच्या निवडश्रेणी प्रशिक्षणाचे नियोजन खालील प्रमाणे देण्यात येत आहे .

अ.क्र.	पहिला टप्पा - नऊ दिवसांचे सत्र	अ.क्र.	दुसरा टप्पा -सहा दिवसांचे सत्र
०१	०२.०९.२०१३ ते १२.०९.२०१३	०१	०२.१२.२०१३ ते ०७.१२.२०१३
०२	१६.०९.२०१३ ते २५.०९.२०१३	०२	०९.१२.२०१३ ते १४.१२.२०१३
०३	२६.०९.२०१३ ते ०७.१०.२०१३	०३	१६.१२.२०१३ ते २१.१२.२०१३
०४	०८.१०.२०१३ ते १८.१०.२०१३	०४	२३.१२.२०१३ ते ३०.१२.२०१३
०५	१९.१०.२०१३ ते २९.१०.२०१३	०५	०६.०१.२०१४ ते ११.०१.२०१४
०६	१३.०१.२०१४ ते २२.०१.२०१४	०६	२०.०३.२०१४ ते २६.०३.२०१४
०७	२७.०१.२०१४ ते ०८.०२.२०१४	०७	२७.०३.२०१४ ते ०३.०४.२०१४
०८	१०.०२.२०१४ ते २०.०२.२०१४	०८	०४.०४.२०१४ ते १०.०४.२०१४
०९	२७.०२.२०१४ ते ०८.०३.२०१४	०९	१४.०४.२०१४ ते १९.०४.२०१४
१०	१०.०३.२०१४ ते १९.०३.२०१४	१०	२१.०४.२०१४ ते २६.०४.२०१४

टीप - वरील नियोजानात नऊ व सहा दिवसांचे गणन करताना रविवार व सार्वजनिक सुट्टया वगळून दिवसांचे गणन केले आहे. त्यामुळे रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सुट्टी राहील.

२/- प्राथमिक शिक्षकांच्या निवडश्रेणी प्रशिक्षणासाठी संदर्भिय शासन पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार १५ दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे नऊ दिवस व सहा दिवस असे दोन टप्पे असून सहा दिवसांच्या दुस-या टप्प्यात एक दिवस मूल्यमापनासाठी असेल . प्रशिक्षणाचा पहिला टप्पा व दुसरा टप्पा यामध्ये साधारणपणे तीन महिंन्याचा कालावधी असणे अपेक्षित असून या कालावधीत विहित करण्यात आलेले स्वाध्याय / प्रकल्प पूर्ण करुन दुस-या टप्पयातील प्रशिक्षणाला उपस्थित राहणे अपेक्षित आहे . या प्रमाणे एकूण १०

सत्रांचे नियोजन दिलेले आहे . नऊ दिवसांच्या पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षणाला जे प्रशिक्षणार्थी उपस्थित असतील तेच तीन महिन्यानंतर येणा-या दुस-या टप्प्यातील सहा दिवसांच्या प्रशिक्षणाला उपस्थित असणे आवश्यक आहे .

३/- सदर प्रशिक्षणाच्या कार्यवाहीसाठी पुढे नमूद केल्याप्रमाणे त्या त्या प्राधिका-यांनी त्यांची जबाबदारी पार पाडून अहवाल सादर करावा .

अ. प्राचार्य , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था -

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांचेकडून निवडश्रेणीकरिता पात्र प्राथमिक शिक्षकांची (पदविका धारक) संख्या प्राप्त करुन घ्यावी . **यामध्ये खाजगी प्राथमिक /माध्यमिक शाळेतील इ. ५ ते ८ साठी च्या कला , कार्यानुभव व शारीरिक शिक्षण शिक्षकांचाही ते निवडश्रेणीच्या इतर अटी पूर्ण असतील तर समावेश करावा.**

२.३१ऑगष्ट२०१३ पूर्वी जिल्हयातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक , माध्यमिक) व सेवांतर्गत अध्यापक विदयालयांचे प्राचार्य यांची बैठक आयोजित करुन संख्येनुसार प्रशिक्षण सत्रांचे नियोजन करावे . नियोजन करत असतांना ज्या सेवांतर्गत अध्यापक विदयालयांमध्ये पत्रद्वारा प्रशिक्षणाची सत्र आहेत त्यांचा व अध्यापक विदयालयातील सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या तुकडया तसेच निवडश्रेणीकरिता पात्र शिक्षकांची संख्या यांचा विचार करावा . तसेच सेवांतर्गत अध्यापक विदयालयातील सेवांतर्गत तुकडीसाठी असणा-या अध्यापकाचार्यांना पूर्ण वेळ कार्यभार राहील याची दक्षता घ्यावी .

३.जिल्हयाच्या नियोजनाची प्रत दिनांक १५.०९.२०१३ पर्यत शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांच्या स्वाक्षरीसह या कार्यालयास व जिल्हयातील सर्व संबंधितांना उपलब्ध करुन द्यावी .

ब. शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक -

१. शासन निर्णय दिनांक २०/०७/२००४ नुसार जिल्हयातील जि.प. , मनपा / नपा सह सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या शासन मान्य प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील निवडश्रेणीसाठी पात्र प्राथमिक शिक्षकांची (पदविकाधारक) संख्या व नावे निश्चित करुन ती प्राचार्य , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांना उपलब्ध करुन दयावी . **यामध्ये खाजगी प्राथमिक /माध्यमिक शाळेतील इ. ५ ते ८ साठी च्या कला , कार्यानुभव व शारीरिक शिक्षण शिक्षकांचाही ते निवडश्रेणीच्या इतर अटी पूर्ण असतील तर समावेश करावा.**

२.प्राचार्य , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या नियोजनानुसार दि. ३१ऑगष्ट२०१३ पूर्वी आयोजित होणा-या नियोजन बैठकीस उपस्थित राहून जिल्हयातील सेवांतर्गत अध्यापक विदयालये / तुकडया , पत्रद्वारा प्रशिक्षणाची सत्र व पात्र शिक्षकांची संख्या यांचा विचार करुन जिल्हयाचे निवडश्रेणी प्रशिक्षणाचे नियोजन करावे .

३.या नियोजनानुसार पात्र शिक्षकांना प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त करावे . कार्यमुक्ती आदेशामध्ये शासन पत्र २८ फेब्रुवारी २००८ नुसार आवश्यक प्रशिक्षण शुल्क रु. १२००/- संबंधित अध्यापक विदयालयाकडे जमा करणेबाबत नमूद करावे व हे प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणास उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी .

४. पहिल्या टप्प्यातील ९ दिवसांच्या प्रशिक्षणासाठी उपस्थित असणा-या प्रशिक्षणार्थीनाच तीन महिन्यानंतर येणा-या दुस-या टप्प्यातील सहा दिवसांच्या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणेकरिता संबंधित अध्यापक

विदयालयांचे प्राचार्य आदेश देतील व त्याची प्रत आपणास दिली जाईल .त्याप्रमाणे सदर प्रशिक्षणार्थी उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी .

क. प्राचार्य , सेवांतर्गत अध्यापक विदयालये (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थासह) -

१.प्राचार्य , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या नियोजनानुसार दि. ३१ऑगष्ट२०१३ पूर्वी आयोजित होणा-या नियोजन बैठकीस उपस्थित राहून जिल्हयातील सेवांतर्गत अध्यापक विदयालये / तुकडया , पत्रद्वारा प्रशिक्षणाची सत्र व पात्र शिक्षकांची संख्या यांचा विचार करुन जिल्हयाचे निवडश्रेणी प्रशिक्षणाचे नियोजन करावे .

२.नियोजनानुसार व अभ्यासक्रम / हस्तपुस्तिका यानुसार प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करावे . आवश्यक पुस्तिका जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडून उपलब्ध करुन घ्याव्यात .

३.प्रशिक्षण शुल्कातील ५० टक्के रक्कम व उपस्थिती अहवाल या कार्यालयास प्रत्येक ०९ दिवसांचे सत्र सुरु झाल्याबरोबर आठ दिवसात सादर करावेत .

४.प्रत्येक टप्प्यातील उपस्थित प्रशिक्षणार्थीना विहित नमुन्यात उपस्थिती प्रमाणपत्र व दुस-या टप्प्याच्या अखेरीस मुल्यमापनामध्ये यशस्वी झालेल्या प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण यशस्वीरीत्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र दयावे .

५.वर्षअखेरीस जमा झालेल्या प्रशिक्षण शुल्कापैकी अध्यापक विदयालयाकडे ठेवण्यात आलेल्या ५० टक्के रकमेचा बाबनिहाय खर्च तपशील व दोन्ही टप्प्यातील उपस्थिती अहवाल सादर करावा .

(नामदेवराव जरग)
संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद
(विदया परिषद)
पुणे

प्रत : १ मा. अपर मुख्य सचिव , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , (कक्ष प्राशि - १) , मंत्रालय विस्तार भवन , हुतात्मा राजगुरु चौक , मादाम कामा मार्ग , मुंबई - ३२

२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक / प्राथमिक) , महाराष्ट्र राज्य ,माध्यमिक व उच्च माध्यमिक / प्राथमिक शिक्षण संचालनालय , मध्यवर्ती इमारत , पुणे - १

३.विभागीय शिक्षण उपसंचालक , विभाग - सर्व

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळ
७०८ ब , रा.ब.कुमठेकर मार्ग , सदाशिव पेठ , पुणे ४११ ०३०
दूरध्वनी क्रमांक:- ०२०/२४४५९३३० फॅक्स क्रमांक:- ०२०/२४४७८३२५
Email : mscert.sbte@gmail.com

प्राथमिक शिक्षकांसाठी निवडश्रेणी प्रशिक्षण

(सर्व व्यवस्थापनाच्या शासन मान्य अनुदानित व विना अनुदानित शाळांमधील प्राथमिक शिक्षक - प्राथमिक शाळांतील इ. १ ते ७ व माध्यमिक शाळांतील इ. ५ ते ७ चे शिक्षक)

कृपया विषयाच्या अनुषंगाने शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र. चवेआ - १०८९ / १११ / माशि - २ , दि. २ सप्टेंबर १९८९ - परिशिष्ट ९ (२) , ग्राम विकास विभाग आदेश क्र. डीएसआर - २४८९ / २११६ / प्र.क्र.५२७ / १८ दि. ४ एप्रिल १९९० परिच्छेद - ५ व ७ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ,शासन निर्णय क्र. चवेआ - १०९५ / (४५२ / ९५) / माशि - २ , दि. ८ डिसेंबर १९९५ परिच्छेद - १ , ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. डीएसआर - २००० / प्र.क्र.१६१ / ११८ दि. ३१ मे २००१ परिच्छेद - २ , शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. शासन निर्णय क्र. पीआरई - २००२ / ३३०२ दि. २० जुलै २००४ व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. पीआरई - २००२ / (३३०२) / प्राशि - १ , दि. १५ नोव्हेंबर २००६ पहावेत .

२/- वरील सर्व शासन निर्णयांनुसार प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणी लागू होण्यासाठी ज्या अटी निर्धारीत केलेल्या आहेत त्याचा संक्षिप्त सारांश पुढील प्रमाणे आहे .

i). संबंधित शिक्षकांन वरीष्ठ वेतनश्रेणीत १२ वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण केली असली पाहिजे .

ii). शासन विहीत करेल असे सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केले असले पाहिजे .

iii). अ- प्राथमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षित पदवीधराची अर्हता मिळविली असली पाहिजे.

ब -प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांसाठी पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षकाची अर्हता प्राप्त केली असली पाहिजे .

क. माध्यमिक शाळेतील प्रशिक्षित अपदवीधर शिक्षकांसाठी पदवी व पदवीधर शिक्षकांसाठी पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षकाची अर्हता प्राप्त केली असली पाहिजे .

या मुख्य अटींबरोबरच निवडश्रेणी मंजूर करण्यासाठी खालील निकष आहेत .

i . निवडश्रेणी ही त्या त्या संस्थेतील व संवर्गातील वरीष्ठ वेतनश्रेणीत वेतन घेणा-या शिक्षक संख्येच्या २० टक्के पदांनाच अनुज्ञेय आहे .

ii. त्या त्या संवर्गात किमान ५ पदे असणा-या प्रवर्गाचाच निवडश्रेणीसाठी विचार करण्यात येतो. निवडश्रेणीसाठी प्राथमिक शिक्षकांची पूर्वीची अर्हताकारी सेवा ग्राहय धरण्यात येईल. मात्र आर्थीक फायदा १ एप्रिल २००४ पासून मिळेल.

iii. दि. ०१.०१.१९८६ रोजी ज्या प्राथमिक शिक्षकांची सलग सेवा १८ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त झालेली असेल फक्त त्यांनाच निवडश्रेणीसाठी निर्धारीत करण्यात आलेली उच्च शैक्षणिक अर्हता धारण करण्याच्या अटीतून सूट मिळू शकेल .

३/- निवडश्रेणीसाठी पात्र होणेकरिता उपरोक्त शासन निर्णयांन्वये निर्धारीत करण्यात आलेल्या अर्टीपैकी दूसरी अट शासन विहीत करेल असे सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केले असले पाहिजे . ही असली

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळ
७०८ ब , रा.ब.कुमठेकर मार्ग , सदाशिव पेठ , पुणे ४११ ०३०
दूरध्वनी क्रमांक:- ०२०/२४४५९३३० फॅक्स क्रमांक:- ०२०/२४४७८३२५
Email : mscert.sbte@gmail.com

तरी एप्रिल २०१० पर्येत असे कोणतेही सेवांतर्गत प्रशिक्षण सुरु करण्यात आले नव्हते . त्यामुळे वेगवेगळया शासन निर्णयान्वये विशिष्ट दिनांकाला वयाची ५५ वर्षे पूर्ण केलेल्या शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या अटीतून सूट देण्यात यावी असे आदेश आहेत . उदा . (शासन निर्णय ८ डिसेंबर १९९५ अन्वये दि. ०१.०१.१९९५ रोजी वयाची ५५ वर्षे पूर्ण करण्या-या माध्यमिक शाळेतील व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या अटीतून सूट देण्यात आलेली आहे . तसेच शासन निर्णय दि. २० जुलै २००४ अन्वये दि. १ एप्रिल २००४ रोजी वयाची ५५ वर्षे पूर्ण करण्या-या शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या अटीतून सूट देण्यात यावी असे आदेश आहेत . तर शासन निर्णय दि. १६ ऑगस्ट २००४ नुसार दि. ३१ डिसेंबर २००६ पर्येत सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करण्यास मूदतवाढ देण्यात आलेली आहे .)

४/- परिच्छेद - ३ चा विचार करता निवडश्रेणीसाठीच्या विहित तीन अटींपैकी १ व ३ क्रमांकाची अट पूर्ण करणा-या शिक्षकांना विहित सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करण्याच्या हमी पत्राच्या आधारे निवडश्रेणी मंजूर केल्या असण्याची शक्यता आहे . तर काहींना शासन निर्णयात नमूद दिनांकाला वयाची ५५ वर्षे पूर्ण केल्यामुळे सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या अटीतून सूट दिली असण्याची शक्यता आहे .

५/- परिच्छेद १ ते ४ चा विचार करुन आपल्या जिल्हयातील निवडश्रेणीकरिता पात्र शिक्षकांची संख्या निश्चित होणे आवश्यक आहे . म्हणजे त्यांच्या प्रशिक्षणाचे नियोजन सुलभ होईल .

६/- शासन पत्र क्र. पीआर्ई - २००७ / (७५४/०७) / प्राशि - १ दि. २८ फेब्रुवारी २००८ नूसार या कार्यालयाच्या पत्र क्र. २३५० दि. १३ जून २००७ अन्वये सादर केलेल्या प्राथमिक शिक्षक निवडश्रेणी प्रशिक्षण अभ्यासक्रम व त्यासंबंधीच्या योजनेस शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या प्रस्तावाप्रमाणे एकूण १५ दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम असून पहिल्या टप्प्यात ९ दिवस , त्यानंतर तीन महिन्यांनी दुसऱ्या टप्प्यात ६ दिवस व दोन टप्प्यांच्या मधल्या तीन महिन्यांच्या कालावधीत नेमून दिलेले स्वाध्याय व प्रकल्प पूणे करणे तसेच दुसऱ्या टप्प्यातील ६ दिवसांत १०० गुणांचे मूल्यमापन व या मूल्यमापनामध्ये किमान ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण संपादन करणाऱ्यांना प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र देणे असे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी शिक्षकांकडून रु. १२००/- इतके शुल्क घेतले जाईल.

अ] सन २०१० - ११ साठी या कार्यालयाचे पत्र क्र. ६७० दि. २०/०२/२०११ नूसार विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयांचे प्रतिनिधी , शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) कार्यालयांचे प्रति[illegible] तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व सेवांतर्गत अध्यापक विदयालयांचे प्राचार्य यांच्या वि[illegible]हाय बैठकांचे आयोजन करुन पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील प्रत्येकी एकूण ५ सत्रांचे नियोजन क[illegible]जनविषयक सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. यासंबंधीचा सविस्तर अहवाल सं[illegible]स्थांकडून प्राप्त झाला . त्याचे संकलित स्वरुप पुढील प्रमाणे ---

i] [illegible]न प्रमाणे प्रशिक्षण आयोजित केलेल्या संस्था--

जिल्हे - १९